पुढारी MY कोल्हापूर रविवार, १० ऑगस्ट २०२५

# 'विवेकानंद'मधील 'परदेशातील उच्च शिक्षण संधी' विषयावरील वेबिनारला प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'परदेशातील उच्च शिक्षण संधी' या विषयावर वेबिनारचे आयोजन करण्यात आले. वेबिनारमध्ये महाविद्यालयातील शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या वेबिनारमध्ये प्रमुख वक्त्या म्हणून अचिव्हर्स ॲकॅडमीच्या संस्थापक पल्लवी देसाई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते. वेबिनारमध्ये परदेशातील उच्च शिक्षण घेण्यासाठी लागणारी तयारी, प्रवेश प्रक्रिया, अभ्यासक्रम, शिष्यवृत्ती योजना, व्हिसा व निवासव्यवस्था याबाबत माहिती देण्यात आली. सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध शंकांचे निरसन करून आवश्यक सल्ला घेतला. कार्यक्रमास अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रमुख पाहुण्यांची ओळख वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी करून दिली. वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. प्रिया पाटील व डॉ. स्नेहल वाडकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ए. आर. कासारकर यांनी आभार मानले.